82

# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २रा मजला,शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३
ईमेल - directorevsed@gmail.com

**प रि प त्र क**

क्रमांक:- डिईटी ११२०१५/२१७/नऊ | मुंबई 28 ऑक्टोंबर, २०१५

विषय:- दारूबंदी अधिनियमातील गुन्हयाचा तपास करण्यासबंधी मार्गदर्शक सूचना

....................

महाराष्ट्र शासनाचा राज्य उत्पादन शुल्क, हा विभाग महत्वाचा घटक असून उत्पादन शुल्क वाढीबरोबरच अनुज्ञप्ती पास परवाने तपासणी, नियम, अनुज्ञप्ती शर्ती व अटींचे पालन होते की नाही याची अंमलबजावणी करणे त्याचबरोबर अत्यंत महत्वाचे दारूबंदी कायद्यान्वये गुन्हयाचा शोध घेणे, गुन्हा अन्वेषणाचे काम करणे, अवैध व्यवसायास आळा घालणे ही मुलभूत कर्तव्ये राज्य उत्पादन शुल्क विभागास पार पाडावी लागतात.

मुंबई दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हयांचा तपास करतांना फौजदारी प्रक्रिया संहिता(CRPC), व भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही व तपास करणे आवश्यक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे सक्तीचे आहे. परंतु आमच्या व मा. आयुक्तांच्या असे निदर्शनास आले आहे की, गुन्हे उघडकीस आणतांना अथवा गुन्हयाचा तपास करतांना कायदेशीर प्रक्रियेचे पालन केले जात नाही. त्यामुळे गुन्हे शाबितीचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे गनण्य झालेले आहे. ही गंभीर व चिंतेची बाब आहे. गुन्हे उघडकीस आणतांना व गुन्हयांचा तपास करतांना खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

**अ) गुन्हा दाखल करण्यापूर्वी :-**

१) गुन्हा उघडकीस आणण्याकरीता बातमीदाराने दिलेल्या किंवा मिळालेल्या माहितीची खातरजमा करून घेणे.

२) खात्री झालेल्या बातमीनुसार घटनास्थळी रवाना होण्यापूर्वी शोध पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी योग्य ती गुन्हे तपासाची, आरोपी अटकेची व मुद्देमाल ताब्यात घेण्यासाठीची आवश्यक असलेली कागदपत्रे, संसाधने यांची तयारी करून घेणे, योजनेची आखणी करणे

३) रवाना होण्यापूर्वी स्टेशन डायरीत सर्व शोध मोहिमेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव, हुद्दा व बक्कल क्रमांकाची तारीख व वेळेनुसार नोंद करणे

४) वरिष्ठांना सदर मोहिमेची माहिती देणे.

31/10

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक ....9336....
दिनांक ....31/10/15....
विभाग ....................

५) घटनास्थळी निघतांना अथवा घटनास्थळाच्या जवळपास पोहोचल्यावर योग्य व लायक पंचांना समज देवून बोलावून घेवून, सोबत ठेवावे.

६) सापळा लावण्यापूर्वी त्या जागेचा कच्चा नकाशा तयार करावा. सर्व शोध पथकातील छापा टाकतांना काय कामगिरी करावयाची आहे याबाबतच्या सूचना शोध पथकातील प्रमुख अधिकाऱ्यांनी शोध पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावयाचे आहेत. घटनास्थळी छापा टाकतांना घटनास्थळाच्या आजूबाजूच्या परिसराची ज्ञात माहितगार माणसाकडून माहिती करून घ्यावी. शोध पथकावर हल्ला होण्याची शक्यता असल्यास अथवा संशयित इसम जमाव करून एकत्र येण्याची शक्यता असल्यास तात्काळ संबंधित पोलीस स्टेशनशी संपर्क साधून योग्य ते पोलीसबळ मागवून घ्यावे.

७) अशा आणीबाणीच्या प्रसंगी शोध पथकातील कर्मचाद्वारे अथवा इतर इसमांद्वारे व्हीडीओ शुटींग करून घेण्याची तयारी ठेवावी.

८) घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी कागदपत्रे, पेपर, लिखाणाचे साहित्य, कॅमेरा/व्हीडीओ कॅमेरा इत्यादी सोबत असल्याची खात्री करावी.

९) नेमून दिलेली कामगिरी पार पाडण्यासाठी व्युहरचना तयार करून घ्यावी. व स्पष्ट सूचना पथकातील स्टाफला द्याव्यात.

१०) मुद्देमाल जप्त करण्यासाठी व वाहून नेण्यासाठी आणलेली वाहने. होडी, बोट इत्यादी योग्य ठिकाणी लावून ठेवावी व त्यांच्या वाहन चालकांना योग्य त्या सूचना देवून सतर्क राहण्यास सागावे.

**ब) घटनास्थळी करावयाची कार्यवाही :-**

१) घटनास्थळी पोहचताच सर्वप्रथम घटनास्थळाचे सर्वेक्षण करण्यात यावे व घटनास्थळाचे मुख्य ठिकाण व प्रमुख आरोपी/संशयितावर लक्ष केंद्रित करावे व ते पळून जाणार नाहीत याकरीता त्यांना तात्काळ ताब्यात घेण्यासाठी संबंधित स्टाफला सूचना द्याव्यात.

२) घटनास्थळाचे सूक्ष्म निरीक्षण करावे व पुराव्याच्या सर्व वस्तू. साधने, साहित्य यांवर लक्ष केंद्रित करून ताब्यात घ्यावे.

३) ताब्यात घेतलेल्या आरोपींची नांवे व पत्ते यांची शहानिशा करावी.

४) घटनास्थळाची जागा कोणाच्या मालकीची आहे त्याबाबत चौकशी करून जागेचा ७/१२, प्रॉपर्टी कार्ड. लाईटबील. टेलीफोन बील इत्यादी ताब्यात घ्यावे.

५) घटनास्थळाचा नकाशा काढून पुराव्या दाखल जप्त केलेला मुद्देमाल व घटनास्थळाचा दोन लायक पंचांसमक्ष पंचनामा करावा. त्यामध्ये जप्त केलेल्या सर्व वस्तूंचे संक्षिप्त वर्णन व उत्पादन केलेल्या कंपनीचे नांव, ब्रॅन्ड, वैशिष्ठ पूर्ण खूणा यांचा उल्लेख करावा. तसेच जप्त मुद्देमालाची वाजवी किंमत सध्याच्या बाजारभावाप्रमाणे लिहिण्यात यावी.

६) पंचनाम्यामध्ये पंचांची नांवे, घटनास्थळाचे वर्णन, जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन, किंमत, चर्तु:सीमा व पंचांच्या, तपासी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या व पंचनाम्याची वेळ नमूद करणे आवश्यक आहे. तसेच अवैध धंदे करणाऱ्या ज्या इसमाकडून गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे त्याचे पूर्ण नांव व त्यास पंचनाम्याची प्रत दिल्याची सही घेणे आवश्यक व बंधनकारक आहे.

७) आरोपी/संशयितास अटक करताना त्याचे पूर्ण नांव, पत्ता याची खात्री करावी. अटकेचा पंचनामा करावा. अटक करण्यापूर्वी त्याने केलेल्या अवैध कृत्याची त्यास जाणीव करून द्यावी व अटकेची कार्यवाही करण्यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. बसू यांच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

८) आरोपी अत्यंत खतरनाक अथवा पूर्व गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास अथवा पळून जाण्याची शक्यता असल्याखेरीज त्यास हाथकडया लावू नये. तसे करावयाचे झाल्यास पंचनाम्यात स्पष्ट उल्लेख करावा व स्टेशन डायरीला नोंद घेण्यात यावी.

९) जप्त केलेल्या मुद्देमालातील रासायनिक तपासणी करीता नमुने घेणे आवश्यक असून त्याचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात यावा. नमुना बाटलीचे सील करताना पंचांचे सहीचे लेबल लावणे आवश्यक आहे.

१०) आरोपीस अटक करताना CRPC कलम ४६, कलम५३ व कलम ५६ च्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे.

११) जप्त मुद्देमालावर पंचांची व तपासी अधिकाऱ्यांची सही घेवून योग्य निगा ठेवण्यात यावी. त्याची नोंद तात्काळ क्राईम रजिस्टर व मुद्देमाल रजिस्टरला घेण्यात यावी.

**क) गुन्हा दाखल करताना :-**

१) मिळालेल्या बातमीवरून व शोध पथकाने केलेल्या कारवाईचा संक्षिप्त तपशिल प्रथम खबरी अहवालात लिहून सरकार तर्फे फिर्यादी होवून प्रथम खबरीची नोंद एफआयआर रजिस्टरला घ्यावी.

२) प्रथम खबरी अहवालावर फिर्यादी व संबधित तपासी अधिकाऱ्याची सही, वेळ व गुन्हयाची कलमे योग्य रितीने लिहिलेली असावीत.

३) प्रथम खबर दिल्यानंतर क्राईम रजिस्टरला त्याची नोंद घ्यावी त्यामध्ये फिर्यादी, आरोपी, मुद्देमाल, अटकेची वेळ व इतर तपशिलवार माहिती असावी.

४) CRPC १५४ प्रमाणे प्रथम खबरी वरती खबरीची प्रत फिर्यादीस दिल्याची फिर्यादीची स्वाक्षरी घेणे बंधंनकारक आहे. तसेच २४ तासात एक प्रत कार्यक्षेत्र असलेल्या मा. न्यायालयास सादर करावी.

**ड) प्रथम खबरी अहवालामध्ये खालील गोष्टींचा उल्लेख असावा.**

१) खबर देणाऱ्या इसमाचे पूर्ण नांव, वय, पत्ता, व्यवसाय, हुद्दा लिहावा.

२) गुन्हा घडल्याची तारीख, वेळ व ठिकाण

३) गुन्हयाचे स्वरूप व परिणाम

४) गुन्हा कोणत्या व्यक्तीविरूध्द घडला त्याचे नांव, पत्ता व तपशिल इत्यादी.

५) गुन्हा घडतेवेळी लागणारा वेळ, वापरलेली पध्दत

६) साक्षीदाराची नांवे व पत्ते

७) जप्ती पंचनाम्याचा संक्षिप्त तपशिल अहवाल

८) मुद्देमालाचे थोडक्यात वर्णन

९) गुन्हा करणाऱ्या आरोपीचा हेतु व उद्देश

१०) फिर्याद देण्यासाठी विलंब झाला असल्यास त्याची कारणे.

**इ) स्टेशन डायरी नोंद :-**

१) दाखल गुन्हयांची संक्षिप्त नोंद स्टेशन डायरीला वेळेसह करण्यात यावी व त्यामध्ये तपासी अधिकाऱ्याचे नांव, हुद्दा नोंद करण्यात यावा.

**फ) केस डायरी(CRPC १७२) :-**

प्रत्येक तपासी अधिकाऱ्याने प्रथम खबर अथवा गुन्हयाची माहिती मिळाल्यापासून ते रवाना झाल्याचा तपशिल, तपासपथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांची नांवे, हुद्दासह वर्णन घटनास्थळी पोहोचल्याचा तपशिल, घटनास्थळी केलेली कारवाई. पंचानामा. आरोपी अटक, मुद्देमाल जप्ती, ताबा, फिर्याद देई पर्यंतचा प्रवास व दिवसभरात केलेला तपासाचा इतर तपशिल, साक्षीदारांची विचारपूस, आरोपी रिमांड, कस्टडी इत्यादी बाबींचा उल्लेख करावा. केस डायरीमध्ये केस डायरीची वेळ, बातमी मिळाल्यापासून ते त्या दिवसापर्यंतच्या तपासाची नोंद घेण्यात यावी. केस डायरी तपास सुरू होवून झाले पासून कोर्टात चार्जशीट पाठवेपर्यंत लिहिण्यात यावी व शेवटची केस डायरी कोर्टात केस चालू असल्याची/निकालाची लिहावी.

**ग) गुन्हयाचा तपास :-**

प्रथम खबर/बातमी मिळाल्यापासून ते दोषारोपपत्र मा. न्यायालयात पाठविण्याच्या संपूर्ण प्रक्रियेस गुन्हयाचा तपास करणे असे म्हटले जाते. गुन्हयाचा तपास करताना CRPC नुसार कार्यवाही करावी. त्यामध्ये प्रथम खबर, घटनास्थळ पंचनामा व नकाशा, जप्ती पंचनामा , आरोपी अटक पंचनामा, साक्षीदारांचे जबाब व विचापूस, गुन्हा नोंद. पुरावे गोळा करणे. आरोपी अटक व मा. न्यायालयासमोर हजर करून रिमांड घेणे आरोपीचा जामीन व जामीनदार, मुद्देमाल रजिस्ट्रीच्या नोंदी, C.A रिपोर्टचा अहवाल, साक्षीदार व आरोपींचे जबाब इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. साक्षीदारांचे जबाब घेताना फिर्याद. घटनास्थळ पंचनामा. मुद्देमाल व आरोपीने केलेल्या गुन्हयाचा तपशिल बाबत सुसंगत मुद्देसूद माहिती त्याचे जबाबात लिहीणे आवश्यक आहे.

**ह) दोषारोपपत्र कोर्टात सादर करणे :-**

संपुर्ण गुन्हयाचा योग्यरित्या तपास केल्यानंतर व आवश्यक ते पुरावे जमा केल्यावर आरोपी/संशयिताने गुन्हा केल्याचे खात्री झाल्यावर CRPC १७३ प्रमाणे अधिकार कक्ष असलेल्या मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करावे.

दोषारोपपत्रात आरोपींची नांवे, पत्ता तपासी अंमलदाराचे नांव, हुद्दा, पत्ता व आरोपीने केलेल्या गुन्हयाचा संक्षिप्त तपशिल(charge) थोडक्यात व कायद्याच्या भाषेत लिहिण्यात यावा व चार्जशीट रवाना केल्याची नोंद स्टेशन डायरीला घ्यावी. दोषारोपपत्रावरती मा. न्यायालयात केस नोंदविल्याचा C.C क्रमांक नोंदविण्यात यावा व दोषारोपपत्राची एक प्रत रेकॉर्डसाठी तपासी अंमलदाराच्या कार्यालयात ठेवण्यात यावी.

**ई) दोषारोपपत्र CRPC १७३ प्रमाणे लिहिण्यात यावे. त्यामध्ये खालील बाबी नमूद कराव्यात .**

१) ६० दिवसाच्या आंतमध्ये संपूर्ण गुन्हयाचा तपास करून दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करणे बंधनकारक आहे. दोषारोपपत्र लिहितांना आरोपीचा तपशिल, नांव, पत्ता इत्यादी सादर करावे.

२) गुन्हयाची जागा, वेळ

३) गुन्हयाचे स्वरूप

४) साक्षीदारांचे नांव व पूर्ण पत्ता

५) कायदा व शिक्षेचे कलम

६) आरोपी अटक, पोलीस कस्टडी/मॅजिस्ट्रेट कस्टडीचा कालावधी, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव

७) जामीनावर सोडल्याचा तपशिल

८) पंच व साक्षीदारांचा तपशिल

९) जप्त केलेला मुद्देमाल C.A अहवाल

१०) आरोपीने केलेल्या गुन्हयाचा संक्षिप्त व कायद्याच्या भाषेतील दोषारोप(charge)

११) सोबत जोडलेली पुराव्याची कागदपत्र, साक्षीदारांचे जबाब इत्यादी.

चार्जशीटची एक प्रत कार्यालयात ठेवण्यात यावी.

**ज) मा. न्यायालयात साक्ष देतांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

१) साक्षीकरीता तपासी अमलदाराने गणवेषात नेमून दिलेल्या वेळी मा. न्यायालयात हजर रहावे.

२) साक्ष देण्यापूर्वी फिर्याद, घटनेचा पंचनामा, चर्तु:सीमा, जबाब, नकाशा, मुद्देमालाचा तपशिल व केस डायरी वाचून घ्यावी.

३) वकीलांनी विचारलेल्या प्रश्नांना मुद्देसुद उत्तरे द्यावीत.

४) केवळ नकारात्मक माहिती देवू नये.

५) साक्ष देण्यापूर्वी पंच व साक्षीदारांना सदर गुन्हयाबद्दल व कागदपत्रांबाबत माहिती द्यावी.

६) उलटतपासणी व फेरतपासणीमध्ये साक्ष देताना असंबंध बोलू नये. गुन्हयाशी संबंधीतच हकीगत सांगावी.

७) बचाव पक्षाचा उद्देश व हेतु लक्षात घेवून त्यानुसार मोजक्याच शब्दात उत्तर द्यावे जेणेकरून त्याचा आरोपीस फायदा होणार नाही व दिलेल्या साक्षीची नोंद केस डायरीमध्ये घेण्यात यावी.

८) साक्षीदार व पंच साक्षीसाठी हजर राहतील याची दक्षता घ्यावी व त्यांना तपास अधिकाऱ्याने मार्गदर्शन करावे, त्यांना त्यांनी केलेल्या कार्यवाहीचे व तपासातील सहभागाचे स्मरण करून द्यावे.

(डॉ. बी. जी. शेखर)
संचालक, अंमलबजावणी व दक्षता,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,
२) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य
३) निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
२) या कार्यालयातील अभिलेख शाखा

प्रत माहितीस्तव सादर :-

मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई